# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

पुण्यनगरी
4 । शुक्रवार, १० नोव्हेंबर २०१७ । पुणे

# विधी सेवा केंद्राच्या मोफत सेवेचा लाभ घ्या

**न्या. वाय. जे. तांबोळी यांचे आवाहन**

। राजगुरुनगर : प्रतिनिधी

विधी सेवा प्राधिकरण आपल्या विधी अधिकारांच्या सेवेसाठी कटिबद्ध असून नि:शुल्क विधी सेवा मिळविण्यासाठी नागरिकांनी नजिकच्या विधी सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन कनिष्ठ न्यायाधीश वाय. जे. तांबोळी यांनी येथे केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना आणि खेड न्यायालय यांच्या वतीने विधी सेवा दिनाचे औचित्य साधून जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. [illegible]




# विधी सेवा समितीमध्ये कायद्याचा गैरवापर

पुणे जिल्हा
प्रभात पुणे, शुक्रवार, दि. १० नोव्हेंबर २०१७
03

## न्यायाधीश एन. के. ब्रह्मे : खेड, आंबेगाव, जुन्नर तालुक्यात कायदेविषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन

राजगुरुनगर, दि. ९ (प्रतिनिधी) - विधी सेवा समितीमध्ये काही लोक कायद्याचा गैरवापर करीत आहेत. त्याला वेळीच आळा घातला पाहिजे, असे प्रतिपादन राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांनी केले. [illegible]

### गरिबांना मोफत सुविधा देण्याचा हेतू

वकील संघटनेत वकिलांची यादी बनवून गरीबातील गरिबांना त्यांच्या माध्यमातून मोफत सेवा सुविधा दिली जाते अशा उदात्त हेतूने काम केले जाते. मात्र काही निवडक लोक त्याचा गैरफायदा घेतला जात आहे. कायद्याचा गैरवापर करणे थांबविले पाहिजे यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. मोफत सहाय्य दिलेल्या व्यक्तीने त्याचे काम जास्तीत जास्त कसे करता येईल याचा प्रयत्न केले पाहिजेत. ज्या व्यक्तींना मोफत सहाय्य आणि आणि सल्ला दिला गेला आहे त्यांनी आपले काम तत्परतेने करून घ्यावे, असे आवाहन न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांनी केले आहे.



राजगुरुनगर : येथे विधी सेवा प्राधिकरण, खेड विधी सेवा समिती यांच्या माध्यमातून राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात विधी सेवा दिवसानिमित्त जनजागृती रॅलीचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांच्या हस्ते झाले.

[illegible]

लोकमत पुणे, शनिवार, दि. ११ नोव्हेंबर २०१७ ३

# विधी सेवा दिनानिमित्त जनजागृती रॅली

लोकमत न्यूज नेटवर्क



राजगुरुनगर येथे विधी सेवा दिनाचे औचित्य साधून जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन खेड सत्र दिवाणी न्यायालयाचे कनिष्ठ स्तर न्यायाधीश वाय. जे. तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आले.

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना आणि खेड सत्र न्यायालय यांच्या वतीने विधी सेवा दिनाचे औचित्य साधून जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी खेड सत्र दिवाणी न्यायालयाचे कनिष्ठ स्तर न्यायाधीश वाय. जे. तांबोळी, एस. डी. देशिंगे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, पोलीस कर्मचारी चंद्रशेखर डुंबरे, न्यायालय शिपाई बी. बी. शिरसाठ आणि एन. एस. एस. व एन. सी. सी.चे सुमारे २०० स्वयंसेवक उपस्थित होते.

या जनजागृती रॅलीच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कनिष्ठ न्यायाधीश वाय. जे. तांबोळी यांनी, विधी सेवा प्राधिकरणे आपल्या विधी अधिकारांच्या सेवेसाठी कटिबद्ध असून नि:शुल्क विधी सेवा मिळविण्यासाठी नजीकच्या विधी सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी न्याय आपल्या दारी, भांडणापेक्षा समझोता बरा जे मिळेल त्यातच आनंद खरा अशा घोषणा दिल्या.

यानिमित्ताने महाविद्यालयात विधी सेवा प्राधिकरण, न्यायिक क्षेत्रास लाभलेले वरदान आणि वैकल्पिक वाद निवारणाचे फायदे व तोटे या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, एन. सी. सी. प्रमुख प्रा. ए. बी. कानवडे यांनी केले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

केसरी पुणे, ११ नोव्हेंबर २०१७ ५

# राजगुरू महाविद्यालयात विधी सेवा दिनानिमित्त जनजागृती रॅली



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित विधी सेवा दिनानिमित्त आयोजित जनजागृती रॅलीत उपस्थित न्यायाधीश व मान्यवर.

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना आणि खेड सत्र न्यायालय यांच्या विद्यमाने विधी सेवा दिनाचे औचित्य साधून जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

यावेळी खेड सत्र दिवाणी न्यायालयाचे कनिष्ठ स्तर न्यायाधीश वाय. जे. तांबोळी, एस. डी. देशिंगे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, पोलीस कर्मचारी चंद्रशेखर डुंबरे, न्यायालय शिपाई बी. बी. शिरसाठ आणि एनएसएस व एनसीसीचे सुमारे २०० स्वयंसेवक उपस्थित होते.

रॅलीप्रसंगी कनिष्ठ न्यायाधीश वाय. जे. तांबोळी म्हणाले, जनतेमध्ये विधी सेवा समितीच्या विविध योजना याबाबत जागरूकता आणण्याच्या उद्देशाने ९ नोव्हेंबर हा दिवस विधी सेवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून नि:शुल्क विधी सहाय्य व सल्ला देणे, विधिसंबंधी जागरूकता आणून लोक अदालतीचे आयोजन केले जाते. महिला व मुले, अनुसूचित जाती आणि जमातीचे सदस्य, अपंग व नैसर्गिक आपत्तीला बळी पडलेले लोक नि:शुल्क विधी सेवेसाठी पात्र असतात. तालुका, जिल्हा, राज्य अथवा इतर सर्व न्यायालये नि:शुल्क विधी सेवा पुरवितात, असेही त्यांनी सांगितले. विधी सेवा प्राधिकरणे आपल्या विधी अधिकारांच्या सेवेसाठी कटिबद्ध असून नि:शुल्क विधी सेवा मिळविण्यासाठी नजीकच्या विधी सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान महाविद्यालयात विधी सेवा प्राधिकरण, न्यायीक क्षेत्रास लाभलेले वरदान आणि वैकल्पिक वाद निवारणाचे फायदे व तोटे या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, एनसीसी प्रमुख प्रा. ए. बी. कानवडे यांनी केले.

सकाळ
पुणे, गुरुवार
१५ नोव्हेंबर २०१७
४



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रांगणात विधी सेवा जनजागृती रॅलीचे उद्घाटन झाले. या वेळी उपस्थित न्यायाधीश वाय. जे. तांबोळी व एस. डी. देशिंगे, ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, डॉ. एस. बी. पाटील, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. जी. डी. गायकवाड

# विधी सेवा दिनानिमित्त राजगुरुनगरला जागृती रॅली

राजगुरुनगर, ता. १४ : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना आणि खेड सत्र न्यायालय यांच्यातर्फे विधी सेवा दिनानिमित्त नुकतेच जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रांगणात रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी खेड सत्र दिवाणी न्यायालयाचे कनिष्ठस्तर न्यायाधीश वाय. जे. तांबोळी व एस. डी. देशिंगे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा. जी. डी. गायकवाड, पोलिस चंद्रशेखर डुंबरे, बी. बी. शिरसाठ आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० स्वयंसेवक उपस्थित होते.

विधी सेवा समितीच्या विविध योजनांबाबत जनतेमध्ये जागरूकता आणण्याच्या उद्देशाने विधी सेवा दिन साजरा करण्यात येतो. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून नि:शुल्क विधी सहकार्य व सल्ला देण्याचे आणि लोक अदालत आयोजित करण्याचे काम केले जाते. महिला व मुले, अनुसूचित जाती आणि जमातीचे सदस्य, अपंग व नैसर्गिक आपत्तीला बळी पडलेले लोक नि:शुल्क विधी सेवेसाठी पात्र असतात, असे कनिष्ठ न्यायाधीश वाय. जे. तांबोळी यांनी सांगितले. नि:शुल्क विधी सेवा मिळविण्यासाठी जवळच्या विधी सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. ए. बी. कानवडे यांनी केले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आभार मानले.

पुणे जिल्हा उत्तर ११ पुढारी पुणे, शुक्रवार
१० नोव्हेंबर २०१७

# राजगुरू महाविद्यालयाची जनजागृती

राजगुरुनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना आणि खेड सत्र न्यायालय यांच्या वतीने विधि सेवा दिनाचे औचित्य साधून जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या वेळी खेड सत्र दिवाणी न्यायालयाचे कनिष्ठस्तर न्यायाधीश वाय. जे. तांबोळी, एस. डी. देशिंगे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. डी. गायकवाड, पोलिस कर्मचारी चंद्रशेखर डुंबरे, न्यायालय शिपाई बी. बी. शिरसाठ आणि एन.एस.एस. व एन.सी.सी.चे सुमारे २०० स्वयंसेवक उपस्थित होते.

जनजागृती रॅलीच्या उद्घाटनप्रसंगी कनिष्ठ न्यायाधीश वाय. जे. तांबोळी म्हणाले, विधि सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून नि:शुल्क विधि सहकार्य व सल्ला देणे, विधिसंबंधी जागरूकता आणून लोकअदालतीचे आयोजन केले जाते.



राजगुरुनगर येथे राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी काढलेली जनजागृती फेरी.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी 'न्याय आपल्या दारी, भांडणापेक्षा समझोता करा, जे मिळेल त्यातच आनंद माना' अशा घोषणा दिल्या. यानिमित्ताने महाविद्यालयात विधि सेवा प्राधिकरण, न्यायिक योजना लाभार्थ्यांचे कायदा आणि वैकल्पिक वाद निवारणाचे फायदे व तोटे या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सर्व कार्यक्रमांचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, एन.सी.सी. प्रमुख प्रा. ए. बी. कानवडे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख